पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/९/कावि/९२६/२००९
दिनांक - २२.१०.२००९

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २७.१०.२००९ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २७.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिति
कार्यपत्रिका क्रमांक- १३८

दिनांक- २७.१०.२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २७.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक २९.९.२००९,०६.१०.२००९,१६.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३४) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ०६.१०.२००९,१६.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३५) सभावृत्तांत कायम करणे.

क) दिनांक १४.१०.२००९ व २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३६) सभावृत्तांत कायम करणे.

ड) दिनांक २०.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३७) सभावृत्तांत कायम करणे.

-------------

विषय क्रमांक- १) मा.विधी समिती सभा दिनांक ११/८/२००९ ठराव क्र.११५ नुसार, पाणीपुरवठा-जलशुद्धीकरण केंद्राचे कामकाज व कामाची निकड विचारात घेता पाणीपुरवठा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ७ संवर्गात ६५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यापैकी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६१ पदे पुर्वीचे मंजुर अर्हतेत तर उर्वरित ०४ पदे सोबतचे प्रपत्र अ मधील अर्हतेत निर्माण करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी मान्य करणेत यावी व त्याव्यतिरीक्त महापालिका आस्थापनेवरील गाळणी चालक व असि.गाळणी निरीक्षक या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान म्हणजेच र.रु.४०००-६००० अशी असून सदर पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती सोपान नसल्याने गाळणी निरीक्षक संवर्गातील एकुण पदांपैकी ७०% पदे सरळसेवेने तर ३०% पदे पदोन्नतीने भरण्यास व ३०% पदे पदोन्नतीने भरण्या करीता येणारी पदे प्रपत्र ब मधील अर्हतेनुसार भरण्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक २) मनपाचे सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-१९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-२६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू. १० कोटी मधून र.रू.५८,००,०००/- कपात करून तसेच अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-१) पान क्रमांक-१८ ते १९ मधील अ.क्र.५ वाहन खरेदी या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू.३,००,००,०००/- मधून र.रू.२५,००,०००/- कपात करून मनपाचे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-७६ ते ७९ मधील आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-१२ साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर एकूण र.रू.८३,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) झो.नि.पू.स्थापत्य या विभागाचे सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे १,९०,७७,०००/- एवढ्या रकमेचे वेगवेगळ्या विकास कामासाठी चे अंदाजपत्रक मंजुर झालेले असून सदर विभागाकडे सद्यःस्थितीतील चालू असलेली कामे, नव्याने सुरू करावयाची कामे तसेच प्रलंबित बिले अदा करण्यासाठी आवश्यक असणारी तरतूद इत्यादीचा विचार करता या विभागाकडे लेखाशिर्षनिहाय असणारी एकूण तरतूद व अंदाजपत्रकाची एकूण रक्कम या मध्ये कोणताही फेरबदल न करता त्यामध्ये ७१ कामांसाठी र.रू.२,८२,६९,०००/- चे वाढ व घट करून प्रपत्राप्रमाणे प्रत्येक लेखाशिर्ष व काम निहाय तरतूदीस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - ४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१८ अन्वये, पिंपरीनगर वॉर्ड क्र.६९ मध्ये ठिकठिकाणी इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४६,६२,०२७/- [र.रू. शेहचाळीस लाख बासष्ठ हजार सत्तावीस] पेक्षा ५.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - ५) वॉर्ड क्र.५८ रावेतमधील डी.वाय.पाटील कॉलेज ते सष्टी फार्म पर्यंत नवीन झालेल्या दुभाजकात दिवे बसविणे या कामाकरिता प्राप्त दरधारकांपैकी लघुत्तम दरधारक मे.ऋषिकेश एन्टरप्रायझेस यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय र.रू. ५०,०००/- [र.रू.पन्नास हजार] पेक्षा ४.६ % कमी दराने करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१३/२००८-०९ मधील अ.क्र.२५ अन्वये, वॉर्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती येथिल भोपते वस्ती मधिल जुने संडास ब्लॉक पाडून व्यायामशाळा बांधणेकामी मे.एल.एम.तुलसानी (नि.र.रू.१२,५५,८००/- [र.रू.बारा लाख पंचावन्न हजार आठशे] पेक्षा ५.५० % जास्त) (सन २००८-०९ चे सुधारित दर सुचीशी तुलना करता ०.३० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - ७) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-१० अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.३५ चा काही भाग व प्रभाग क्र२९ संपुर्ण मनपा भवन मोरवाडी मासुळकर कॉलनी येथील घरोघरचा कचरा नियोजित वेळापत्रक व रूट चॉर्ट प्रमाणे गोळा करणे व गोळा केलेला कचरा मोशी डेपो येथे खाली करणेकामी मे.डी.एस.कुलकर्णी (प्रति दिनी र.रू.२,४००/-) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे. (नि.र.रू.६,००,०००/- [र.रू.सहा लाख])
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - ८) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.६ नुसार, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर सन २००९-१० करिता र.रु.५०,००,०००/- तरतुद करण्यात आलेली असल्याने या तरतुदीमधुन सन २००९-१० या आर्थिक वर्षात प्रपत्र "अ" प्रमाणे महापौर चषक क्रिडा स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी अंदाजे येणारे र.रु.१४,७८,५५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - ९) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.७ नुसार, मनपाचे पिंपळे गुरव व्यायामशाळेतील कुस्ती हौदातील मातीत टाकणेकामी तेल,लिंबु,काउ, हळद व दही इत्यादी पदार्थ बाजारभाव प्रमाणे थेट पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२१,८३०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १०) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१० नुसार, प्रस्तावासोबतचे प्रपत्र "अ" प्रमाणे ३१ व्यायाम शाळांकरीता व्यायाम साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ११) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१२ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या एकुण ७१ व्यायामशाळा आहेत. त्यातील ३० व्यायामशाळा सेवाशुल्क देवुन सार्वजनिक संस्था / मंडळांना चालविण्यास दिलेल्या असून त्यापैकी से.नं.२२, झेड क्लस्टर ओटा स्किम, निगडी व्यायामशाळा श्रीराम भवन हनुमान तरुण मंडळाने ११ महिने भाडे कराराने चालविण्यास मिळणेबाबत विनंती केली असल्याने त्यांना ११ महिने कराराने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार दरमहा र.रु.१८००/- सेवाशुल्क देवुन व्यायामशाळा चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१३ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या एकुण ७१ व्यायामशाळा आहेत. त्यातील ३० व्यायामशाळा सेवाशुल्क देवुन सार्वजनिक संस्था / मंडळांना चालविण्यास दिलेल्या असून त्यापैकी राजर्षी शाहु महाराज कै.अण्णाभाउ साठे नगर, निगडी व्यायामशाळा, सम्यक क्रांती मित्र मंडळाने ११ महिने भाडे कराराने चालविण्यास मिळणेबाबत विनंती केली असल्याने ११ महिने कराराने करारनाम्यातील अटी शर्तीनुसार दरमहा र.रु.१८००/- सेवाशुल्क देउन व्यायामशाळा चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १३) मनपाच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाचे वापराकरीता टाटा एल.पी.टी.७१२/३८ बी.एस. III कॅब विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची एक नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ३००० लि. क्षमतेची जेटींग यंत्रणा (एक नग) र.रू.१५,१३,०३६/- (सर्व करासहीत), टाटा एल.पी.टी. १११२/४२ बी.एस.III कॅब विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची एक नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ६००० लि.क्षमतेची जेटींग यंत्रणा (एक नग) र.रू. १७,९७,१२६/- (सर्व करासहीत) व टाटा एल.पी.टी.१६१५/४२ बी.एस.III विथ साईड पी.टी.ओ. या मॉडेलची दोन नग चॅसिज खरेदी करून त्यावर मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे ८००० लि.क्षमतेची जेटींग कम सक्शन यंत्रणा र.रू.२२,९१,७६०=४० (प्रती नग) प्रमाणे दोन नग जेटींग कम सक्शन यंत्रणा र.रू. ४५,८३,५२०=८० (पुर्णांकीत र.रू.४५,८३,५२१/-) असे एकूण चार नग यंत्रणा मे.एम.एस.एस.आय.डी.सी., पुणे यांचेकडून र.रू.७८,९३,६८३/- (सर्व करासहीत) त्यांचे समवेत करारनामा करून खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १४) श्री.राजू करूणाकरन यांचा कामाचा अनुभव लक्षात घेता श्री.राजू करूणाकरन यांना आदेशाच्या तारखेपासून दि.८/११/२००९ या कालावधीकरता दरमहा एकत्रित र.रू. ६,०००/- [र.रू.सहा हजार] मानधनावर प्रोस्थेटिस्ट कम ऑर्थेटिस्ट या पदावर हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१३/२००८-०९ मधील अ.क्र.५ अन्वये, विकासनगर येथे शिंदे पेट्रोल पंप ते देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दी पर्यंतचा मुख्य रस्ता हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू. ४४,६८,६२५/- [र.रू.चव्वेचाळीस लाख अडुसष्ठ हजार सहाशे पंचवीस] पेक्षा ५.६० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.९४ अन्वये, पिंपरी वाघेरे प्रभाग क्र.७३ मधिल यशवंतराव चव्हाण स्टेडियमचे दुरुस्ती, नुतनीकरण व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस (नि.र.रू. ४६,४३,२५६/- [र.रू.शेहचाळीस लाख त्रेचाळीस हजार दोनशे छपन्न] पेक्षा ००.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा अटीनुसार निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १७) डॉ.श्रीम.दिपाली भांगे-डि.जी.ओ. यांना स्त्रीरोग तज्ञ व प्रसुती शास्त्रतज्ञ या पदाकरिता व डॉ.शल्मित वैद्य-एम.एस. जनरल सर्जरी यांना सर्जन या पदावर प्रस्तावात नमुद दरमहा एकत्रित मानधनावर तसेच कालावधीकरता हंगामी नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १८) मुंबई बंगलोर हायवे जवळ पुनावळे व ताथवडे हद्दीत नविन जकात नाक्यासाठी बसविण्यात येणाऱ्या फायबर केबीन मध्ये विद्युत विषयक कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झाली असून मे.क्वॉलिटी इले.एंटरप्रायजेस यांचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ४.६ % कमी असून सदरचे काम हे तातडीचे असलेने त्यांचेकडुन करारनामा करून कोटेशन पध्दतीने करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. [र.रू.५०,०००/-]
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - १९) पवनानदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्राप्त झालेल्या दरांपैकी मे.एच.सी.लुंकड यांचे दर पोकलन प्रती तास २२००/- व डंपर प्रति दिन र.रु.३०००/- कमी दर असुन मनपा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने सदर दर स्विकारणेस व करारनामा न करता थेट पद्धतीने मे.एच.सी. लुंकड यांचेकडून दि.२०/७/०९ ते २४/७/०९ या कालावधीत काम करुन घेतलेने त्याकामी सेवाकरासह अंदाजे र.रु.१,५५,५२३/- खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - २०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी सन २००९ - १० साठी आवश्यक जंतुनाशके, किटकनाशके खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रकात प्राप्त लघुत्तम दरांच्या [१) ई नि.सु.क्र.८/२/०९-१० र.रु.८,१०,०००/- २)ई.नि.सु.क्र. ८/३/०९ - १० र.रु.५,६९,२५०/- ३) ई.नि.सु.क्र.८/४/०९-१० र.रु.४,७६,०००/- ४) ई.नि.सु.क्र.८/५/०९-१० र.रु.९,१३,७२०/- ५)ई.नि.सु.क्र.८/६/०९-१० र.रु.६,२१,०००/- ६)ई.नि.सु.क्र. ८/७/०९-१० र.रु.६,८३,४००/- ७) ई.नि.सु.क्र.८/८/०९-१० र.रु.८,२२,५००/- ८) ई.नि.सु.क्र ८/९/०९-१० र.रु.४,४५,२००/-] अनुषंगाने करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले असल्याने सदर करारनाम्यांचे अवलोकन करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - २१) दवाखाने/रुग्णालयांची सध्याची आवश्यक मागणी लक्षात घेऊन पुढील पुरवठा आदेश द्यावे लागणार असुन STP कडून E-Tendering पद्धतीने औषधे/साहित्य निविदा प्रक्रिया Demo पूर्ण होऊन निविदाधारकांना दर भरणेसाठी १५ ते २१ दिवस मुदत द्यावी लागणार असल्याने STP कडून २९/९/२००९ रोजी Demo होऊन निविदा प्रसिद्धी करणे Finalise झालेस संपुर्ण

निविदा प्रक्रिया ऑक्टोबर २००९ अखेर पुर्ण होईल तोपर्यंत दवाखाने/ रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या औषधे/साहित्य खेरदीकामी र.रु.१,५०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - २२) श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ,कचराकुली यांच्यावर खातेनिहाय चौकशीमध्ये सिद्ध झालेले दोषारोप,अंतिम नोटीसचा त्यांचा खुलासा व चौकशीनंतरही त्यांची मोठ्या प्रमाणातील गैरहजेरी यानुसार श्री.वेताळ यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने त्यांना सेवेतून काढून टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२७.१०.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक - २३) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००८-२००९ मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभागांतर्गत जुने नादुरुस्त खांबांची दुरुस्ती करुन पुर्नउभारणी करणेकामी मे.दिग्विजय इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.४,६३,८२९/- [र.रू.चार लाख त्रैसष्ठ हजार आठशे एकोणतीस] पेक्षा ४१.५१% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - २४) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.७ अन्वये, तळवडे गावठाणामधील नियोजित स्मशान भूमीजवळ स्वच्छतागृह बांधणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.एम.जी.खाडे (नि.र.रू.४,६२,१८४/- [र.रू.चार लाख बासष्ठ हजार एकशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १९.७७% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - २५) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.४ अन्वये, तळवडे गावठाण रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४,६२,१८४/- [र.रू.चार लाख बासष्ठ हजार एकशे चौऱ्याऐंशी] पेक्षा ९.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - २६) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.१९ अन्वये, वॉर्ड क्र.६ मोरे वस्तीमधील ताराबाई मोरे सोसायटीमध्ये रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रू.४,६५,८८५/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार आठशे पंच्याऐंशी] पेक्षा ९.६०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - २७) यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील शस्त्रक्रिया कक्ष व इतर ठिकाणचे तातडीचे आवश्यक विद्युतीकरण कामकाज करणे या कामाची तातडीची गरज लक्षात घेता सर्वात कमी दर धारक एजंसी मे.भाग्यश्री एन्टरप्रायजेस, यांचेकडून रीतसर करारनामा करुन काम करणेस व त्याकामी येणाऱ्या ०.५% कमी दरानुसार र.रु.४९,७३५/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - २८) चिंचवड (केशवनगर शाळा) ते काळेवाडी पुलाजवळ उच्चदाब वाहिनी केबल टाकणेकामी विज पर्यवेक्षण शुल्क र.रु.२८,८५०/- म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - २९) मुख्य लेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयातील प्रथमत: १०० विद्यार्थ्यांसाठी अबॅकस प्रशिक्षण सुरु करणेकामी १०० विद्यार्थ्यांचा खर्च X २२०० = र.रु.२,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित असला तरी सदर संस्थेने ५०% सवलत दिल्याने एकूण १०० विद्यार्थ्यांचा खर्च र.रु.१,१०,०००/- होत असल्याने सदर खर्च हा थेट पद्धतीने करारनामा न करता करणेस व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास व श्री.शारदा या संस्थेस कामकाज देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३१) दापोडी येथे टँकर भरणेचे ठिकाणापर्यंत काँक्रीट रोड तयार करणे व पाण्याच्या टाक्यांखाली काँक्रीटींग करणेकामी अतिरिक्त बाब रक्कम रु.७८,७५८/- चे काम सदर निविदेअंतर्गत करुन घेतलेमुळे अंतिम बीलाची रक्कम अंदाजपत्रकीय खर्चाच्या कमाल मर्यादेपेक्षा (रु.३,९८,००२/-) रक्कम रु.९,८८३/-ने जास्त झाली आहे. परंतु सदरचा खर्च मुळ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असल्यामुळे सदरच्या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३२) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२.१०.२००९ ते दि.१८.१०.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७४/२००९ दि.२२.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ३३) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.५.१०.२००९ ते दि.११.१०.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७३/२००९ दि.२२.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ३४) ब प्रभागाअंतर्गत रावेत हायमस्ट नर्सरीजवळ स्ट्रीटलाईटसाठी विजपुरवठा करणेकामी बसविण्यात आलेल्या रोहीत्र संचाची (६३ KVA) दुरुस्ती रीवायडींग करणेचे काम तातडीचे असलेने मे.सिद्धीविनायक इंजि. सर्व्हीसेस यांचेकडुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १% कमी दराने करारनामा करुन कोटेशन पद्धतीने करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(अं.खर्च र.रु.५०,०००/-)

विषय क्रमांक - ३५) २००९-१० चे अंदाजपत्रकात पानांक ४९१ अ क्र.३ वर नि.नोटीस क्र.३/८ ०८-०९ साठी एकुण रक्कम रु.१० लाख इतकी तरतुद करणेत आली. परंतु सदरचे काम पुढील आर्थिक वर्षात करावयाचे असल्याने सदर कामाकरीताच्या र.रु.१० लाख रुपये तरतुदमधुन रक्कम रुपये ७ लाख तरतुद ब प्रभागाअंतर्गत वॉर्ड क्र.६२ मधील दळवीनगर, भोईरनगर या भागातील रस्ता रुंदीकरणातील व शहर सुशोभिकरण अंतर्गत लघुदाब पोल व तारा हलविणे (नि.नोटीस क्र.३/४ ०८-०९) या कामाकरीता वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रभाग क्रमांक ३६) प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथील वीजसंच मांडणीस वीजपुरवठा करणारे स्विचगियर यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करणे हे काम कामाची तातडीची गरज लक्षात घेता, सर्वात कमी दरधारक मे.भाग्यश्री इंटरप्रायजेस, यांचेकडून रीतसर करारनामा करुन काम करणेस व त्याकामी येणाऱ्या ०.५% कमी दरानुसार र.रु.४९,६८२/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/९२६/२००९
दिनांक : २२/१०/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.